**प्रश्नोत्तरे**

## (१) पार्श्वभूमी

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या अधिवेशनात साधारणपणे प्रत्येक बैठकीचा पहिला तास प्रश्नोत्तरासाठी राखून ठेवण्यात येतो. यावरुन या आयुधाचे महत्व लक्षात येते. संसदीय लोकशाहीमध्ये लोकप्रतिनिधींना जी अनेक संसदीय आयुधे उपलब्ध आहेत त्यामध्ये अत्यंत महत्वाचे व परिणामकारक असे प्रश्नोत्तराचे आयुध आहे. अगदी थोड्या वेळात अनेक हेतू, तक्रारी, अडचणी, समस्या त्याद्वारे साध्य करता येतात. राज्य शासनाच्या विविध योजना व राज्यकारभारासंबंधीचे विविध प्रश्न व कार्यपध्दती याबाबत असणाऱ्या जनतेच्या तक्रारी लोकप्रतिनिधींना प्रश्नाद्वारे सभागृहासमोर मांडता येतात. जनतेच्या तक्रारी, अडचणी याबाबत शासनाची भूमिका समजून घेण्यासाठी आणि लोकांच्या तक्रारी/गाऱ्हाणी शासनाच्या निदर्शनास आणण्यासाठी प्रश्नोत्तरे पध्दतीचा उपयोग होतो.

राज्य शासनाच्या विविध प्रशासकीय कार्यपध्दती व विविध योजनांच्या यशापयशाचे तसेच योजनांमध्ये झालेला गैरव्यवहार यामध्ये लोकप्रतिनिधींनी प्रश्नाद्वारे विचारलेली माहिती मा.मंत्री महोदयांनी अनुपुरक प्रश्नोत्तराच्या वेळी तोंडी व तात्काळ देणे आवश्यक असते. त्यामुळे प्रश्नोत्तराचा तास म्हणजे मंत्री महोदयांची व पर्यायाने राज्य शासनाची तारेवरची कसरत असते. प्रश्नोत्तराच्या तासामुळे नागरी सेवक कार्यतत्पर राहतो व आपले कर्तव्य दक्षतापूर्वक पार पाडणे त्याला भाग पडते. शासनाची धोरणे आणि त्यांची प्रशासकीय अंमलबजावणी स्पष्ट करण्याची संधी प्रश्नोत्तराच्या तासामध्ये मंत्र्यांना मिळते. प्रश्नोत्तराचा तास म्हणजे संसदीय कामकाजपद्धतीमधील सर्वात महत्वाचा घटक आहे. लोकप्रतिनिधी व माननीय मंत्री यांच्यामध्ये प्रत्यक्ष प्रश्नोत्तरांद्वारे चर्चा होत असल्याने व त्या चर्चेचे प्रतिबिंब संपूर्ण राज्यात माध्यमांव्दारे ठळकपणे उमटत असल्यामुळे प्रश्नोत्तरांच्या तासाला अनन्यसाधारण महत्व आहे.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या अधिवेशन कालावधीत विधानपरिषद सभागृहाच्या प्रत्येक बैठकीची सुरुवात सर्वसाधारणपणे प्रश्नोत्तराच्या तासाने होते. प्रत्येक सभेच्यावेळी प्रश्नोत्तरासाठी एक तास वेळ देण्यात येतो (महाराष्ट्र विधानपरिषद नियम १७). याबाबतची कार्यपध्दती महाराष्ट्र विधानपरिषद नियमावलीतील नियम क्रमांक ६६ ते ९१ यामध्ये विस्ताराने दिली आहे.

## (२) विधानमंडळात विचारले जाणारे प्रश्न तीन प्रकारचे असतात :-

(अ) तारांकित प्रश्न

(ब) अतारांकित प्रश्न

(क) अल्पावधी सूचना प्रश्न

### (अ) तारांकित प्रश्न :-

ज्या प्रश्नांना सभागृहात तोंडी उत्तरे दिली जातात, अशा प्रश्नांना तारांकित प्रश्न असे म्हणतात (महाराष्ट्र विधानपरिषद नियम ७० (१)). सदर तारांकित प्रश्न मा.सदस्यांकडून QIS या संगणकीय प्रणालीद्वारे दोन टप्प्यात स्वीकारण्यात येतात.

- चक्रानुक्रम –

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या अधिवेशनाचा दिनांक निश्चित झाल्यानंतर यथाशीघ्र चक्रानुक्रम (रोटेशन ऑर्डर) तयार केला जातो. सदर चक्रानुक्रमानुसार मा.सदस्यांकडून QIS या संगणकीय प्रणालीद्वारे पहिल्या टप्प्यात म्हणजे अधिवेशन सुरु होण्याच्या ४५ दिवस अगोदर - प्रत्येकी ३१ तारांकित प्रश्न सूचना व दुसऱ्या टप्प्यात म्हणजे

अधिवेशन सुरु होण्याच्या ३० दिवस अगोदर - अमर्यादित तारांकित प्रश्न सूचना स्वीकारण्यात येतात व त्यावर QIS या संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून ऑनलाईन (Online) पध्दतीने या सचिवालयाकडून कार्यवाही करण्यात येते.

चक्रानुक्रमामध्ये मा.मंत्री महोदयांना त्यांच्या विभागांशी संबंधित प्रश्नांना उत्तरे देणे सोयीचे व्हावे या दृष्टीने मंत्र्यांची गटवार विभागणी केली जाते. गटवार विभागणी करतांना विधानसभा व विधानपरिषद या दोन्ही सभागृहात एका दिवशी समान विभाग येणार नाहीत याबाबत नियोजन करुन मंत्री महोदयांना एकाच दिवशी विधानसभा व विधानपरिषद सभागृहात प्रश्नोत्तरासाठी जावे लागणार नाही याची दक्षता घेण्यात येते. अशाप्रकारच्या गटवार विभागणीत आवश्यकतेनुसार वेळोवेळी बदल केला जातो.

मा.मंत्री महोदयांकडे असलेल्या विभागांसंबंधीचे तारांकित प्रश्न तोंडी उत्तराकरिता ज्या दिनांकास घेण्यात येतील, ते दिनांक चक्रानुक्रमात दर्शविलेले असतात. त्यानुसार आठवड्यातील सोमवार ते शुक्रवार या पाच दिवसांसाठी पाच गट "चक्रानुक्रमात" तयार केले जातात. चक्रानुक्रमात (१) गट क्रमांक, (२) गटामध्ये समाविष्ट असलेले मंत्री, (३) प्रश्नाच्या उत्तराचा दिनांक, (४) प्रश्नांची सूचना या सचिवालयास मिळण्याचा अखेरचा दिनांक तसेच मंत्र्यांचे नाव व त्यांच्या अधीन असलेले विभाग यासंबंधीचे विवरण इत्यादी बाबी नमूद करण्यात येतात.

मा. सदस्यांना तारांकित प्रश्न वेळेवर देता यावेत यादृष्टीने त्यांच्याकडे या सचिवालयातर्फे अधिवेशनाच्या ५५ दिवस अगोदर तारांकित प्रश्नांचा "चक्रानुक्रम" (रोटेशन ऑर्डर) विधानपरिषद पत्रक भाग दोन द्वारे माहितीसाठी ई-मेलद्वारे पाठविण्यात येतो (महाराष्ट्र विधानपरिषद नियम ७६). तसेच महाराष्ट्र विधानमंडळाच्या www.mls.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येतो.

तारांकित प्रश्नांच्या उत्तरावर सभापतींच्या परवानगीने सदस्यांना पुरवणी प्रश्न विचारुन अधिक खुलासा वा स्पष्टीकरणही घेता येते. एका सदस्यांचे एका दिवशी तोंडी उत्तरासाठी फक्त तीनच तारांकित स्वीकृत प्रश्न तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीत दाखल करण्यात येतात (महाराष्ट्र विधानपरिषद नियम ७५ (१)).

तोंडी उत्तरासाठी मांडण्यात आलेला कोणताही प्रश्न मा. सभापतींच्या मते लेखी उत्तर देण्यास अधिक योग्य असल्यास मा. सभापतींच्या निदेशानुसार लेखी प्रश्नोत्तरांच्या (अतारांकित) यादीत समाविष्ट करण्यात येतो. तसेच, मा. सभापतींना योग्य वाटल्यास तारांकित प्रश्नांची सूचना दिलेल्या मा. सदस्यांकडून तोंडी उत्तर हवे असण्याची कारणे जाणून घेऊन त्यानुसार सदर प्रश्न मा. सभापतींच्या निदेशानुसार तारांकित अथवा अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीत समाविष्ट करण्यात येतो. (म.वि.प. नियम ७१)

महाराष्ट्र विधानपरिषद नियम ७६ च्या तरतूदीस अधीन राहून शासनाकडून तशा अर्थाची विनंती करण्यात आली असेल किंवा एखादा प्रश्न दाखल करुन घेण्याजोगा आहे किंवा नाही हे ठरविण्यासाठी अधिक कालावधीची आवश्यकता आहे असे सभापतींचे मत असेल तर तो प्रश्न सभापतींच्या निदेशानुसार सदस्यांनी सूचनेत निर्दिष्ट केलेल्या दिनांकानंतरच्या एखाद्या दिनांकास उत्तरासाठी तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीत समाविष्ट करण्यात येतो (महाराष्ट्र विधानपरिषद नियम ७७).

सदस्यांना त्यांचा प्रश्न बैठकीच्या ज्या दिनांकास यादीत ठेवण्यात आला असेल त्या दिनांकापूर्वीच्या दिवशी सूचना देऊन त्यांचा प्रश्न मागे घेता येईल किंवा सदर सूचनेत निर्दिष्ट केलेल्या दिनांकापर्यंत लांबणीवर टाकता येईल आणि अशा इतर दिवशी, नियम ७६ च्या तरतूदीस अधीन राहून, सदर प्रश्न ज्या दिनांकास उत्तरासाठी ठेवावयाचा असेल त्या दिनांकासाठी स्वीकृत करण्यात आलेल्या सर्व प्रश्नानंतर सदर प्रश्न त्या दिनांकाच्या यादीत समाविष्ट करण्यात येतो. अशा प्रकारे लांबणीवर टाकण्यात आलेला प्रश्न, तो लांबणीवर टाकण्यात आल्याबाबतची सूचना मिळण्याच्या दिवसापासून संपूर्ण दोन दिवस होईपर्यंत यादीत समाविष्ट करता येत नाही

(महाराष्ट्र विधानपरिषद नियम ८१). तसेच सदर प्रश्न देताना सदस्यांनी कोणत्या मंत्र्याला उद्देशून प्रश्न विचारला आहे, हे देखील त्या सूचनेत नमूद करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या अधिवेशन कालावधीत दर आठवड्याला सोमवारपासून शुक्रवारपर्यंत ज्या दिवशी विधानपरिषद सभागृहाच्या बैठका असतात त्या प्रत्येक दिवशी सुरुवातीला एक तास तारांकित प्रश्नोत्तरासाठी उपलब्ध असतो (महाराष्ट्र विधानपरिषद नियम १७). चक्रानुक्रमात दर्शविलेल्या प्रत्येक गटातील मंत्र्यांच्या अधीन असलेल्या विभागासंबंधीच्या तारांकित प्रश्नोत्तराची यादी प्रश्नोत्तरांच्या तासाच्या वेळेपूर्वी दोन तास अगोदर मा.सदस्यांना सभागृहात वितरीत करण्यात येते.

**(ब) अतारांकित प्रश्न :-**

जेव्हा मा.सदस्यांना त्यांच्या प्रश्नांना (तोंडी उत्तरे नको असतील) फक्त लेखी स्वरुपात केवळ माहिती किंवा विस्तृत सांख्यिकीय आकडेवारी हवी असते अशावेळी मा. सदस्य अतारांकित प्रश्नांची सूचना देऊ शकतात. (महाराष्ट्र विधानपरिषद नियम ७० (२)). अशा प्रश्नांची सूचना देण्यासाठी कोणताही कालावधी विहित करण्यात आलेला नाही. त्यामुळे मा.सदस्य QIS या संगणकीय प्रणालीद्वारे वर्षभर केव्हांही अतारांकित प्रश्नांच्या सूचना सादर करु शकतात.

मा. सभापतींनी स्वीकृत केलेले अतारांकित प्रश्न शासनाच्या संबंधित विभागाकडे पाठविल्यानंतर प्रश्न विभागाला मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसाच्या आत त्याचे उत्तर संबंधित विभागाने देणे आवश्यक आहे (महाराष्ट्र विधानपरिषद नियम ७०(२)). महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०२३ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनापासून अतारांकित प्रश्नांची उत्तरेदेखील केवळ संगणकीय प्रणालीद्वारे स्वीकारण्यात येत आहेत.

विभागाकडून अतारांकित प्रश्नांची उत्तरे प्राप्त झाल्यानंतर प्रत्येकी २० अतारांकित प्रश्नोत्तरांची एक यादी याप्रमाणे याद्या मुद्रित करुन त्या नजीकच्या अधिवेशनात सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतात व तद्नंतर या सचिवालयाच्या www.mls.org.in या संकेतस्थळावर प्रसिध्द केल्या जातात.

**(क) अल्पावधी सूचना प्रश्न :-**

एखाद्या सार्वजनिक महत्वाच्या व निकडीच्या प्रश्नाचे उत्तर मा. सदस्यांना ताबडतोब पाहिजे असल्यास सदस्यांनी त्याबाबत QIS या संगणकीय प्रणालीद्वारे अल्पावधी प्रश्न सूचना दिली पाहिजे (म.वि.प. नियम ८४ (१)). अशी सूचना अधिवेशनाच्या किवा तहकूब केलेल्या अधिवेशनाच्या प्रारंभापूर्वी ७ दिवसांच्या आधीची नसली पाहिजे. अल्पावधी सूचना प्रश्नाव्दारे विचारलेली माहिती बृहन्मुंबईच्या हद्दीत प्राप्त होण्यासारखी असल्यास प्रश्न विचारल्याच्या दिनांकापासून ७ दिवसांचे आत व ती माहिती बृहन्मुंबईच्या हद्दीबाहेरील असल्यास १४ दिवसांच्या आत प्रश्नाचे उत्तर देणे आवश्यक आहे (म.वि.प. नियम ८४ (४)). असा प्रश्न मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी स्वीकृत केल्यानंतर संबंधित मंत्री उत्तर देण्यास तयार आहेत किंवा कसे याबाबत या सचिवालयाकडून विचारणा केली जाते. संबंधित मंत्री तयार असल्यास त्यांना सोयीस्कर असेल अशा कोणत्याही दिवशी सदरहू अल्पावधी सूचना प्रश्न त्या दिवशीच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात येतो. असा प्रश्न त्या दिवशीच्या कामकाजामध्ये तारांकित प्रश्नोत्तराच्या आधी चर्चेसाठी घेण्यात येतो व त्यावर तारांकित प्रश्नाप्रमाणेच अनुपूरक प्रश्नोत्तरे होतात.

**(३) कोणते प्रश्न स्वीकृत होतात :-**

तारांकित प्रश्नांचा "चक्रानुक्रम" मा.सदस्यांना पाठविल्यानंतर त्यानुसार मा.सदस्यांकडून तारांकित प्रश्नांच्या सूचना QIS या संगणकीय प्रणालीद्वारे या सचिवालयास सादर करण्यात येतात. मा.सदस्यांनी प्रश्न सूचना देतेवेळी आपल्या प्रश्न सूचनेत खालील बाबींचा प्रामुख्याने उल्लेख करुन प्रश्न सूचना दिल्यास त्यांचे प्रश्न गुणवत्तेवरुन स्वीकृत होऊ शकतात.

(१) प्रश्नात उल्लेखित निवेदन कोणी, कोणास व केव्हा दिले याबाबत स्पष्ट उल्लेख असावा.

(२) प्रश्नाधीन घटना नक्की कोणत्या गावात/तालुक्यात/जिल्ह्यात आणि निश्चित केव्हा घडली आहे याचा दिनांकासह उल्लेख असावा.

(३) प्रश्नाद्वारे निश्चित कोणत्या कालावधीतील माहिती अपेक्षित आहे तो कालावधी प्रश्नसूचनेत स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे.

(४) प्रश्नामध्ये उल्लेखित मागणी अथवा तक्रार शासनाकडे केली आहे असा उल्लेख केला जातो, प्रश्न स्वीकृत होण्यासाठी प्रश्नात उल्लेखित मागणी अथवा तक्रार कोणी, नक्की केव्हा म्हणजे कोणत्या दिनांकास आणि शासनाच्या निश्चित कोणत्या अधिकाऱ्याकडे केली आहे याचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे.

(५) एखाद्या प्रश्नात गैरव्यवहार/भ्रष्टाचार याबाबत उल्लेख केला असल्यास या गैरव्यवहाराचे/ भ्रष्टाचाराचे स्वरुप काय आहे, त्यामध्ये गुंतलेले अधिकारी/कर्मचारी कोण आहेत, गैरव्यवहार/भ्रष्टाचाराबाबत कोणी व केव्हा तक्रार केली अथवा घटना केव्हा उघडकीस आली. त्यामध्ये अंदाजे किती रकमेचा गैरव्यवहार/भ्रष्टाचार झाला आहे इत्यादीबाबत स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे.

तारांकित प्रश्न स्वीकृत होण्यासाठी जो प्रश्न विचारला जातो त्या प्रश्नातील विषयाबाबत राज्य शासन प्रामुख्याने जबाबदार असणे, प्रश्नाधीन विषय हा सार्वजनिक महत्त्वाचा असणे व प्रश्नाधीन विषय संबंधित मंत्र्यांच्या अधिकारकक्षेतील असणे तथा प्रश्नाला वस्तुस्थितीचा आधार असणे आवश्यक आहे.

राज्य शासनाची जबाबदारी, विविध अधिनियम व नियमांद्वारे राज्य शासनास प्राप्त होणाऱ्या अधिकाराच्या व मर्यादेच्या अनुषंगाने अजमावली जाते. विद्यापीठे, स्वायत्त संस्था यांच्या अधिकारक्षेत्रात येणाऱ्या बाबीसंबंधी, तसेच राज्य परिवहन महामंडळ, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायती यासारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिकारक्षेत्रात येणाऱ्या विषयासंबंधीचे प्रश्न स्वीकृतीचे वेळी तत्संबंधी करण्यात आलेल्या कायद्यातील तरतुदी, शासनाचे नियंत्रण वा जबाबदारी व संबंध ह्यांचा परामर्श घेऊन सार्वजनिक महत्त्वही लक्षात घेतले जाते.

राज्य शेती महामंडळ, राज्य वित्तीय महामंडळ, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण मंडळ, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, खादी ग्रामद्योग महामंडळ यासारख्या स्वतंत्र, स्वायत्त व वैधानिक संस्था यासंबंधीच्या प्रश्नांच्या स्वीकृतीचे वेळी त्या त्या बाबतीतील उपरोक्त संस्थांवरील शासनाचे नियंत्रण, जबाबदारी, संबंध आदी बाबी विचारात घेतल्या जातात. उच्च न्यायालय व धर्मादाय आयुक्त यांच्या कक्षेतील विषयाबाबत राज्य शासनाची जबाबदारी येत नसल्यामुळे तसेच, न्यायीक प्रक्रियेच्या संदर्भात शासनाने हस्तक्षेप करणे उचित नाही म्हणून सर्वसाधारणपणे उच्च न्यायालय तसेच धर्मादाय आयुक्त यांच्या संदर्भातील प्रश्न स्वीकारले जात नाहीत.

केंद्र शासनपुरस्कृत काही योजना शासनाकडे राबविण्यासाठी दिल्या असतील तर त्याबाबतचे प्रश्न (उदा.राज्य कामगार विमा योजना), त्या विषयाबाबत राज्य शासनाची असलेली जबाबदारी आणि नियंत्रण याचा विचार करुन प्रश्न स्वीकृत अगर अस्वीकृत केले जातात.

सर्वसाधारण व्यक्तिगत तक्रारीच्या स्वरुपाचे प्रश्न अस्वीकार्य ठरतात. परंतु व्यक्तिगत स्वरुपाच्या प्रश्नास सार्वजनिक महत्त्व असेल किंवा एखादे तत्व किंवा धोरण समाविष्ट असेल तर प्रश्न स्वीकारतेवेळी मा.सभापतींकडून वेगळा विचार केला जाऊ शकतो.

काही प्रश्न सभागृहापुढे येण्याच्या दृष्टीने गौण सार्वजनिक महत्त्वाचे असतात. अशा प्रश्नांच्या बाबतीत प्रश्नाधीन बाब गौण सार्वजनिक महत्त्वाची म्हणून सदस्यांनी प्रथम संबंधित मंत्रीमहोदयांकडे जाऊन दाद मागावी असे सभापतींनी आदेश दिले असतील तर अशा प्रश्नांच्या बाबतीत प्रथम सदस्यांनी मंत्र्यांकडे जाऊन त्याबाबत दाद मागणे आवश्यक आहे. अशा प्रकरणी आवश्यक ती माहिती सदस्यांना देण्यासंबंधी शासनाद्वारे विविध विभागांना सूचनाही दिल्या आहेत. सदस्यांनी सभापतींच्या आदेशानुसार मंत्र्यांकडे सदर प्रकरण नेल्यावरही दाद लागली नाही तर मा.सभापतींना अशा प्रश्नांच्या स्वीकृतीबाबत फेरविचार करता येतो.

**(४) प्रश्न अस्वीकृत केव्हा होतात :-**

आपले प्रश्न मा.सभापतींनी अस्वीकृत करु नयेत असे सदस्यांना वाटणे स्वाभाविक आहे. आपल्या तारांकित प्रश्नांच्या सूचना अस्वीकृत होऊ नयेत म्हणून तारांकित प्रश्नांची सूचना देताना सदस्यांनी खालील निकषाचे पालन केल्यास सदस्यांचे प्रश्न स्वीकृत होण्यास मदत होईल. कोणते प्रश्न अस्वीकृत ठरतात याविषयी महाराष्ट्र विधानपरिषद नियमावलीतील नियम ६८ मध्ये नमूद केलेल्या बाबींकडे सदस्यांचे लक्ष वेधण्यात येत आहे. साधारणपणे प्रश्न खालील कारणास्तव अस्वीकृत होतात. –

(१) प्रश्न सुगम करण्यासाठी खरोखर जरुर नसलेले कोणतेही नाव किंवा विधान त्यात आणता कामा नये;

(२) जर त्यात एखादे विधान असेल तर प्रश्न विचारणाऱ्या सदस्याने त्या विधानाच्या अचूकतेबद्दल आपण स्वत: जबाबदार राहिले पाहिजे;

(३) एखाद्या सार्वजनिक बाबींसंबंधाने शासनाच्या हेतूविषयी त्यात स्पष्टीकरण मागता येईल. परंतू , तो प्रश्न, प्रश्न विचारणाऱ्या सदस्याने उपस्थित केलेल्या बाबींसंबंधात कोणतीही विशिष्ट कारवाई करण्यासंबंधी वस्तुत: सूचना म्हणून असता कामा नये;

(४) त्यात कोणतेही युक्तीवाद, अनुमाने, दोषारोप, वक्रोक्तिपूर्ण शब्दप्रयोग किंवा बदनामीकारक मजकूर असता कामा नये;

(५) त्यात अभिप्राय व्यक्त करण्याविषयी किंवा कायद्याच्या तात्त्विक प्रश्नांची किंवा काल्पनिक विधानाची उकल करण्याविषयी मागणी करता कामा नये;

(६) त्यात पदीय / किंवा सार्वजनिक नात्याने असेल त्या व्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीचे चारित्र्य किंवा वर्तन याविषयी उल्लेख असता कामा नये;

(७) त्यात विधानपरिषदेने नेमलेल्या कोणत्याही समितीतील कामकाजाविषयी माहिती विचारलेली असता कामा नये;

(८) तो अतिशय लांबलचक असता कामा नये;

(९) त्यात जिच्या वर्तनावर फक्त मूळ प्रस्तावाच्या रूपाने आक्षेप घेता येईल अशा कोणत्याही व्यक्तींचे चारित्र्य किंवा वर्तन याविषयी ठपका ठेवलेला असता कामा नये;

(१०) त्यात वैयक्तिक चारित्र्यावर आरोप केले असता किंवा असे आरोप गर्भित असता कामा नये;

(११) त्यात प्रश्नाच्या उत्तरात स्पष्टीकरण करता येणे शक्य होणार नाही इतके मोठे धोरणेविषयक प्रश्न उपस्थित करता कामा नये;

(१२) त्यात आधीच उत्तर दिलेल्या किंवा ज्यास उत्तर देण्याचे नाकारण्यात आले असेल अशा प्रश्नांच्या आशयाची पुनरूक्ती असता कामा नये;

(१३) त्यात क्षुल्लक बाबीसंबंधी माहिती विचारता कामा नये;

(१४) त्यात सामान्यतः गतेतिहासासंबंधी माहिती विचारण्याचा हेतू असता कामा नये;

(१५) त्यात पहाता येण्याजोग्या कागदपत्रात किंवा सामान्य संदर्भ ग्रंथात दिलेली माहिती मागता कामा नये;

(१६) त्यात महाराष्ट्र शासनाला प्रामुख्याने जबाबदार नसलेल्या संस्थांच्या किंवा व्यक्तींच्या नियंत्रणाखाली असलेल्या बाबी उपस्थित करता कामा नयेत;

(१७) त्यात गुप्त स्वरूपाच्या बाबींसंबंधी माहिती विचारण्याचा हेतू असता कामा नये; आणि

(१८) तो, ज्या बाबींशी एखाद्या मंत्र्यांचा पदपरत्वे संबंध नसेल अशा बार्बीसंबंधी असता कामा नये.

उपरोक्त नियमाच्या तरतुदीनुसार प्रश्नात अनुमाने, दोषारोप, उपरोधिक शब्द किंवा बदनामीकारक मजकूर असता कामा नये, तसेच विधानमंडळ हे मा.सभापती यांच्या अखत्यारीत काम करीत असल्याने त्यासंबंधी कोणताही प्रश्न विचारता येत नाही.

## (५) प्रश्न विचारताना सदस्यांनी घ्यावयाची काळजी :-

मा.सदस्यांनी दिलेली प्रश्न सूचना शासनाच्या एकाच विभागाशी संबंधित असावी, त्यात एकापेक्षा अधिक विषय असू नयेत. तसेच प्रश्न सूचना सुस्पष्ट, सुसंबध्द मुद्देसूद व सुटसुटीत असावी. कोणत्याही प्रश्नाची सूचना देताना सदस्यांनी खालील बाबींची काळजी घेतल्यास प्रश्न स्वीकृतीबाबतचा निर्णय लवकर होण्यास मदत होईल. प्रश्न स्वीकृतीसंबंधी निर्णय घेण्यास सोयीचे व्हावे, तसेच प्रश्नाचे स्वरुप (तारांकित प्रश्न, अतारांकित प्रश्न ) निश्चित करण्यासाठी सदस्याकडून साधारणत: खालील मुद्यांबाबत खुलासा मागविण्यात येतो :-

(१) आपली नक्की तक्रार काय आहे ?

(२) प्रश्न विचारण्यामागे आपला निश्चित हेतू कोणता आहे ?

(३) प्रश्नाचे तोंडीच उत्तर आपणास का हवे आहे ?

(४) प्रश्न नक्की कोणत्या गावात, तालुक्यात, जिल्ह्यात घडलेल्या घटनेसंबंधी आहे ?

(५) प्रश्नाधीन माहिती निश्चित कोणत्या कालावधीची हवी आहे ?

(६) प्रश्नाधीन घटना केव्हा घडली आहे ?

(७) महाराष्ट्र विधानपरिषद नियम ६८ (२) अन्वये प्रश्नामधील विधानाच्या सत्यतेबाबत आपण जबाबदारी घेण्यास तयार आहेत काय ?

(८) प्रश्नाधीन मागणी कोणी, केव्हा व शासनाकडे म्हणजे निश्चित कोणत्या अधिकाऱ्याकडे केली आहे ?

(९) प्रश्नाधीन माहिती पूर्वी दिलेल्या उत्तरात समाविष्ट असल्यास सदरहू प्रश्नाबाबत आपला आग्रह आहे काय ? असल्यास, उत्तरात कोणत्या मुद्याबाबत ?

एखाद्या प्रश्नाच्या बाबतीत सदस्यांकडून काही खुलासा मागविला असेल आणि सदस्यांकडून त्या खुलाशाचे उत्तर आले नाही किंवा उत्तर इतक्या उशीराने आले असेल की, ते विचारात घेता येणे आणि तो प्रश्न स्वीकृत करण्यात आला तर समुचित तारखेच्या प्रश्नांच्या यादीत समाविष्ट करणे शक्य नसेल तर असे प्रश्न मुदतबाह्य ठरविण्याचा अधिकार सभापतींना आहे. तसेच अशा प्रश्न सूचना व्यपगत झाल्या असे समजण्यात येईल. (महाराष्ट्र विधानपरिषद नियम ८३).

**(६) तारांकित प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलटची कार्यपध्दती :-**

मा. सदस्यांकडून तारांकित प्रश्न सूचना दोन टप्प्यात स्वीकारण्यात येतात –

(अ) अधिवेशन सुरु होण्याच्या ४५ दिवस अगोदर - प्रत्येकी ३१ तारांकित प्रश्न सूचना

(ब) अधिवेशन सुरु होण्याच्या ३० दिवस अगोदर - अमर्यादित तारांकित प्रश्न सूचना

- पहिल्या टप्प्यात ४५ दिवस अगोदर सदस्यांकडून स्वीकारण्यात येणाऱ्या तारांकित प्रश्नांपैकी तारांकित स्वीकृत प्रश्नांचेच केवळ सदस्यनिहाय बॅलट QIS या संगणकीय प्रणालीवर काढण्यात येते. तर दुसऱ्या टप्प्यात ३० दिवस अगोदर सदस्यांकडून स्वीकारण्यात येणाऱ्या प्रश्नांचे कोणतेही बॅलट काढण्यात येत नाही.
- महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०२२ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनापासून सदरहू बॅलट मा.सदस्यांच्या व्हिडीओ कॉन्फरन्सिंगवरील ऑनलाईन उपस्थितीत घेण्यात येते.
- तारांकित स्वीकृत प्रश्नांचे बॅलट काढून झाल्यानंतर मा.सदस्यांकडून तारांकित स्वीकृत प्रश्नांचा प्राथम्यक्रम बॅलटच्या दिवशी QIS या संगणकीय प्रणालीवर ऑनलाईन पद्धतीने भरुन घेण्यात येतो. व त्यानुसार त्यांच्या तारांकित स्वीकृत प्रश्नांची संगणकीय प्रणालीमध्ये नोंद घेऊन ते अद्ययावत केले जातात.
- तसेच मा.सदस्यांकडून स्वीकारण्यात येणाऱ्या दुसऱ्या टप्प्यातील प्रश्न सूचनांपैकी तारांकित स्वीकृत होणारे प्रश्न सदर बॅलटसाठी घेण्यात येणाऱ्या प्रश्नांनंतर अनुक्रमे तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीत समाविष्ट करण्यात येतात.

**(७) प्रश्नसूची व प्रश्नोत्तराची यादी :-**

एखाद्या विशिष्ट दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीमध्ये आपला प्रश्न कोणत्या क्रमांकावर आहे याबाबत सदस्यांना पूर्वकल्पना यावी तसेच त्या संबंधित दिवशी त्यांनी सभागृहामध्ये उपस्थित रहावे, चर्चेत भाग घेता यावा व अनुपूरक प्रश्नाद्वारे अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रश्नाच्या संदर्भातील पूर्वतयारी त्यांना करता यावी यासाठी संबंधित तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीमध्ये समाविष्ट असलेल्या प्रश्नांचे अनुक्रमांक, प्रश्न क्रमांक, प्रश्न विचारणारे सदस्य व प्रश्नाचा विषय इत्यादी माहिती समाविष्ट असलेली प्रश्नसूची प्रश्नोत्तरांच्या दिनांकाच्या आदल्या दिवशी सदस्यांना सभागृहातील लॉबीमधील सदस्यांच्या नावे असलेल्या टपालखणाद्वारे वितरीत केली जाते व तद्नंतर सदर तारांकित प्रश्नसूची या सचिवालयाच्या www.mls.org.in संकेतस्थळावरदेखील उपलब्ध करुन दिली जाते.

तारांकित प्रश्नोत्तरांची मुद्रित यादी विधानपरिषद सभागृहाची बैठक सुरु होण्यापूर्वी दोन तास आधी मा. सदस्यांना सभागृहात वितरीत करण्यात येते तसेच सदर तारांकित प्रश्नोत्तराची यादी या सचिवालयाच्या www.mls.org.in संकेतस्थळावरदेखील उपलब्ध करुन दिली जाते.

**(८) अधिक माहिती:-**

विधानपरिषद सभागृहात प्रश्नोत्तराच्या तासावेळी एखाद्या विचारल्या गेलेल्या अनुपूरक प्रश्नाच्या संदर्भात मा.मंत्री महोदयांनी अधिक माहिती देण्यासंबंधीचे आश्वासन दिले असेल किंवा मा.सभापतींनी मा.मंत्री महोदयांना अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्याचा निदेश दिला असेल तर, त्यानुसार सभागृहासमोर अधिक माहिती ठेवण्यात येते. अधिक माहितीवर पुन्हा अनुपूरक प्रश्न विचारले जात नाहीत.

**(९) अर्धा-तास चर्चा :-**

महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील नियम ५६ व नियम ९२ (१) मधील तरतुदींच्या अनुषंगाने अर्धा-तास चर्चेबाबत मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिलेल्या निदेश क्रमांक ११ नुसार अर्धा-तास चर्चेसाठी नेमून दिलेल्या सोमवार, मंगळवार, बुधवार व गुरुवार या चार दिवसांपैकी प्रत्येक मंगळवार हा दिवस विधानपरिषदेत नुकतेच उत्तर दिलेल्या तारांकित किंवा अतारांकित उत्तरातून उद्धवलेल्या पुरेशा सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करण्यास नेमून देण्यात आला आहे व सोमवार, बुधवार, गुरुवार हे दिवस सर्वसाधारण अर्धा-तास चर्चा उपस्थित करण्यास नेमून देण्यात आले आहेत. अर्धा-तास चर्चेच्या सूचना सदस्यांद्वारे स्वीकारणे व सदर सूचनांवरील कार्यवाही ही QIS या संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन (Online) पध्दतीने करण्यात येते.

अर्धा-तास चर्चेची सूचना ज्या दिवशी उपस्थित करावयाची असेल त्याच्या तीन दिवस अगोदर सूचना देणे आवश्यक आहे. सदर सूचनेत सदस्यांना जे मुद्दे उपस्थित करावयाचे असतील ते मुद्दे सुस्पष्टपणे थोडक्यात सूचनेमध्ये नमूद केले पाहिजेत, तसेच अर्धा-तास चर्चा उपस्थित करण्याची कारणे नमूद करणारी एक स्पष्टीकरणात्मक टिप्पणी सदर सूचनेमध्ये असली पाहिजे. अशा सूचनेला कमीत कमी दोन सदस्यांनी अनुमोदन देऊन पाठिंबा दर्शविणे आवश्यक आहे. (महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९२ (२) (अ)).

मा.सदस्यांकडून प्राप्त झालेल्या अर्धा तास चर्चेच्या (प्रश्नातून उद्धवणारी / सर्वसाधारण) सूचनांपैकी स्वीकृत अर्धा तास चर्चेच्या सूचनांचे बॅलट QIS या संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन (Online) पध्दतीने घेण्यात येते. सदर बॅलेटमध्ये आलेल्या दोन अर्धा-तास चर्चेच्या सूचना ह्या अर्धा तास चर्चेकरिता नेमून दिलेल्या त्या त्या दिवशीच्या बैठकीच्या कामकाजाच्या क्रमात शेवटी दाखविण्यात येतात.

अर्धा-तास चर्चा उपस्थित करणारा सदस्य अनुपस्थितीत असल्यास त्या सूचनेस पाठिंबा देणाऱ्या कोणत्याही सदस्यांस सभापतींच्या संमतीने चर्चा उपस्थित करता येईल.

*******